Historicity Research Journal
Volume 1 | Issue 7 | March 2015 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संसदीय लोकशाही संबंधीचे विचार

**राम फुन्ने**

प्राचार्य, स्व. नितीन महाविद्यालय, पाथरी जि.परभणी

***सारांश :***

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचलित व्यवस्थेतील दोष नष्ट करुन भारताला प्रगत व आदर्श राष्ट्र बनविण्यासाठी व हक्कवंचित समूहाला स्वाभिमानाचे प्रचंड बळ दिले. स्वतःच्या आयुष्यात सतत सामाजिक न्यायाचा पुरस्कार करुन ते देशातील बहुजनांचे प्रेरणास्थान बनले. त्यांनी देशातील बहुजनांची स्थिती, त्यांच्या जीवनातील अगतिकता, शोषण, विषमता, गुलामगिरी सर्व जाणले होते. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला वाचा, आत्मसन्मान व स्वाभिमान दिला. देवाचे असे वर्णन करतात की, मुक करोति वाचालम लंघ्यवते पंगू गिरी।। म्हणजे परमेश्वर मुक्या माणसाला वाचा देतो, बोलायला शिकवतो आणि पंगू माणसाला डोंगर ओलांडण्याची शक्ती देतो. शतकानुशतके भारतातील शूद्र बहुजनांना वाचा नव्हती म्हणजे त्यांना जीभ होती पण बोलता येत नव्हते. बाबासाहेबांनी लाखोच्या या मूक समाजाला बोलके केले. बहुजन समाजासाठी बाबासाहेब मूक नायक ठरले. शोषिक बहुजन समाजाला वर्णवादी व्यवस्थेतून बाहेर काढण्यास घटनेत विशेष तरतुदी करुन संसदीय लोकशाही तत्त्वाचा स्विकार केला.

***प्रस्तावना :***

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही संबंधी जो विचार केला आहे तो सभोवतालच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक वास्तवांच्या संदर्भात केला असल्यामुळे त्यात आदर्शवादाच्या भराऱ्यापेक्षा व्यावहारिक प्रश्नांचे जागते भान जागोजाग आढळते. सामान्यातिसामान्य माणसाच्याही प्रतिष्ठेची प्रतिष्ठापना करणारा ज्ञानप्रकार म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही बद्दल आस्था होती. प्रत्येक देशात जो एक परंपरेने चालत आलेला सत्ताधारक वर्ग असतो त्याचा तो एकाधिकार नष्ट होऊन वर्षानुवर्षे सत्तेपासून वंचित राहिलेला पददलित वर्गांना सत्ता प्राप्त होणे ही बाबासाहेबांच्या मते लोकशाहीची खरी कसोटी असते. सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराद्वारेच या कसोटीला लोकशाही उतरु शकते.

डॉ.बाबासाहेबांच्या लोकशाही विचारात मानवी हक्कांना व त्यांच्या संरक्षणांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या मते राजकीय लोकशाहीची उभारणी चार ग्रहितांवर झालेली असते.

१) व्यक्ती हेच एकमेव साध्य.
२) व्यक्तीला काही अदेय हक्क असतात व संविधानाने त्या हक्काची हमी त्याला दिलीच पाहिजेत.
३) कोणत्याही विशेषाधिकाराच्या प्राप्तीसाठी व्यक्तीला आपल्या संविधानिक हक्काचा त्याग करावा लागू नये.
४) इतरावर शासन करण्याची सत्ता राज्यसंस्थेकडून कोणत्याही खाजगी व्यक्तींना दिली जाता कामा नये.

हुकूमशाही कोणत्याही स्वरुपाची असो डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा तिला सक्त विरोध होता. कारण व्यक्तीची अंगभूत प्रतिष्ठाच त्या शासनात असत नाही. व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व व हक्क तिथे पायदळी तुडविले जातात. मूलभूत हक्कांचा लाभ जास्तीत जास्त लोकांना प्राप्त होणे हा डॉ.बाबासाहेबांच्या मते लोकशाहीचा सर्वश्रेष्ठ निकष आहे. सर्व नागरिकांना समान संधी मिळाली पाहिजे सर्वांच्या

मागण्या व हितसंबंध यात सुसंवाद निर्माण झाला पाहिजेत. अल्पसंख्याकांच्या बहुसंख्याकाना निर्णयापुढे मान झुकवू नये. त्याच प्रमाणे अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांना संरक्षण देण्याचे सौजन्य बहुसंख्याकाजवळ पाहिजे.

नागरिकांच्या हक्काना संरक्षण आणि कल्याणाची हमी मिळविण्यासाठी लोकमतावर अधारीत बलवान शासनाची गरज आहे. या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संघराज्यरचने पेक्षा एक केंद्रि शासन व्यवस्था इष्ठ वाटत असे. त्यांच्या मते संघराज्यात्मक शासन हे बहुदा दुबळे असते. या कारणांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ मधील संघराज्यात्मक तरतूदींना विरोध केला होता. एक केंद्रि शासन हे एकात्म जन इच्छेने प्रातिनिधीक असल्यामुळे ते अधिक समर्थ व कार्यक्षम असते, भारताला असेच शासन हवे असे त्यांचे म्हणणे होते.

संविधान समितीत आणि तत्पुर्वी १९४२ मध्येही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संसदीय लोकशाहीची भलावन केली असली तरी 'स्टेटस अँड मायनॉरिटीज' या आपल्या पुस्तकात त्यांनी संसदीय कार्यप्रणालीपेक्षा अन्य प्रकारची कार्यप्रणाली भारताला योग्य ठरेल असे प्रतिपादन केले होते. इंग्लंडमध्ये अल्पमत व बहुमत राजकीय आधारावर असते तसे भारतात होण्याची शक्यता नाही कारण इथले बहुजन जातीवाचक असणे अपरिहार्य आहे. अशी आंबेडकरांची खात्री होती. असे जातीय बहुसंख्याकाकडून लोकशाहीच्या आदर्शांना धरुन वर्तन केले जाण्याची शक्यता त्यांच्या मते फारच थोडी होती. उलट बहुसंख्याक जातीगटाचे वर्चस्व स्थापन होऊन अल्पसंख्याक गटांना त्याचा कायम जाच होण्याचीच मोठी शक्यता त्यांना दिसत होती. अमेरिकेसारखी अध्यक्षीय शासनपध्दती स्विकारल्यास कार्यपालिकेला आपल्या कार्यकालाची हमी मिळू शकेल आणि विधिमंडळ बाहेरच्या योग्य व्यक्तीला कार्यपालिकेत समाविष्टही करता येईल. या दृष्टीने अशा कार्यपालिकेची निवड भारतासाठी करावी अशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. कार्यपालीका प्रातिनिधीक असल्याने अल्पसंख्याकाचे हक्क आपोआपच सुरक्षित होतात. असे मानने त्यांना भ्रममूलक वाटते. जिथे राजकारणाचे बरेचशे धर्म निरपेक्षिकरण झाले आहे अशा युरोपातही प्रातिनिधिक कार्यपालिका दुबळ्या ठरतात. तर जिथे राजसत्ता ही धर्मसत्तेचेच अंग आहे अशा भारतात तर ती अधिकच दुबळी ठरणे भाग आहे. धर्मसत्तेपासून पददलित वर्गांना सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने संसदीय ार्यपालिेपेक्षा अन्य पर्यायच इष्ट ठरु शकेल. पुढे मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या भूमिकेला मुरड घालून सांसदिय लोकशाहीची संयुक्तीतता अधोरेखित केली आहे. सांसदूय लोकशाही नामक पुस्तिकेत ते म्हणतात की, संसदीय पध्दतीच व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता उपक्रमशिलता व जबाबदारीची जाणीव करु शकते. सहकार्य, शिस्त, शील, सचोटी, समर्पित भाव, इत्यादी गुणांचा स्विकार करुन व्यक्तिला मुक्तीचा मार्ग ती खुला करते. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही तत्त्वाचा पुरस्कार केला आहे.

**संसदीय लोशाही :**

देशाचा राज्यकारभार करण्याच्या अनेक प्रणाल्यामधील लोकशाही ही एक सर्वोत्कृष्ठ शासन प्रणाली आहे. लोशाही शासन प्रकारात संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही असे दोन प्रकार आहेत. जसे की अमेरिकेत अध्यक्षीय लोकशाही आहे. तर इंग्लंडमध्ये संसदीय लोकशाही आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संसदीय लोकशाही तत्त्वाचा स्विकार केला आहे. त्यांची लोकशाही शासन व्यवस्थेची संकल्पना फार उदात्त होती. लोकशाही म्हणजे निव्वळ राजसत्तेचा प्रकार नाही. तर लोकशाही ही जीवन प्रणाली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना लोकशाहीतून रक्तहीन क्रांती हवी होती. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात अध्यक्षीय लोकशाही तत्त्वाचा स्विकार न करता संसदीय लोकशाही तत्त्वाचा स्विकार केला. अध्यक्षीय लोकशाही आणि संसदीय लोकशाहीत मूलभूत फरक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाणीवपूर्वक संसदीय लोकशाही तत्त्वाचा स्विकार केला. अध्यक्षीय शासन प्रकार हा चांगला शासन प्रकार असला तरी या शासन प्रकारात जबाबदारीच्या तत्त्वाचा अभाव आहे. अध्यक्षीय शासन व्यवस्थेत एकदा का राष्ट्रपतीची निवड झाली तर त्याला चार वर्षापर्यंत पदावरुन सहजासहजी कोणीही काढू शकत नाही. आणि तो कायदेमंडळाला जवाबदेही नाही. जवाबदेही त्याला म्हणतात की, अगर कुणी आपल्याला प्रश्न विचारला तर त्याला उत्तर देणे आपल्यावर बंधनकारक असते. अध्यक्षीय लोकशाहीत जवाबदेही तत्त्वाची उणिव आहे. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जवाबदेही आणि जबाबदारीच्या तत्त्वाचा अंतर्भाव असलेल्या लोकशाही तत्त्वाचा पुरस्कार केला आहे.

संसदीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला जबाबदार असते. आणि जो पर्यंत कायदेमंडळाचा विश्वास कार्यकारी मंडळावर असतो तोपर्यंतच कार्यकारी मंडळाला सत्तेवर राहता येते. कायदेमंडळाचा विश्वास गमवला तर मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. त्याचबरोबर संसदेमध्ये सभासदाने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देणे सरकारवर बंधनकारक असते. संसदीय शासन व्यवस्थेतील जवाबदेही आणि जबाबदारीच्या तत्वामुळे सरकारवर मोठ्या प्रमाणात बंधने येतात. सरकारला विचारपूर्व धोरणे राबवावी लागतात. जर चुकीची धोरणे अवलंबली आणि संसदेत अविश्वास ठराव पारित झाला तर सरकारला राजीनामा द्यावा लागतो. जवाबदेही तत्वामुळे

मंत्रीमंडळाला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर संसदेत द्यावे लागते. त्यामुळे मंत्रिमंडळातील सदस्यांना विचारपूर्वकच उत्तर द्यावे लागते. जर चुकीचे उत्तर दिले तर जनमत त्याच्या विरोधात जाते. एकूणच संसदीय लोकशाही ही भारतीय जनतेसाठी उपयुक्त असून ती भारतीयासाठी उत्तम शासन व्यवस्थेचा प्रकार आहे.

१. संसदीय लोकशाहीत लोकमत हा सरकार बनवण्याचा आधार असतो. सरकार बनवणे पाडणे ही कामे लोकमताच्या आधारे होतात.
२. नियमित वेळेत निवडणूका होतात त्या शक्य तितक्या निर्भय स्वच्छ वातावरणात घेतल्या जातात. तसेच लोकशाहीत मतदार स्वइच्छेने मतदान करु शकतो.
३. मतदारांचा सहभाग राजकीय जीवनात वाढतो त्यामुळे मतदार, उमेदवार, लोकप्रतिनिधी या सर्वांच्या गुणांचा विकास होतो. सर्वांना समान संधी मिळते. जबाबदारीची व बांधिलकीची जाणीव होते.
४. संसदीय लोकशाहीत रक्तपात न होता राज्यकर्ते बदलले जातात.
५. संसदेत प्रत्येक प्रश्नावर चर्चा होते. वाद-विवाद होऊन उघडपणे लोकांच्या, प्रसिध्दी माध्यमांच्या साक्षीने विधेयके मंजूर होतात वा फेटाळली जातात. आर्थिक बजेटावरही खुली चर्चा होते.
६. संसदीय लोकशाहीत विविध पक्ष निर्माण होतात. लोकमत घडवितात. विरोधी पक्ष सरकारच्या चुका लोकांसमोर मांडतो लोकांत राजकीय पक्षामुळे जाणीव जागृती निर्माण होते.

एकूणच संसदीय लोकशाही शासन प्रकार चांगला असून भारतीयांसाठी तो उपयुक्त आहे. परंतु संविधान कर्त्यांनी काही धोकेही सूचविले आहेत. संसदीय लोकशाहीचे सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीत रुपांतर केले पाहिजेत. म्हणजेच समाजात समता प्रस्थापित केली पाहिजेत. कारण राजकीय लोकशाही ही जर सामाजिक लोकशाहीवर अधिष्ठित केली नाही तर ती टिकूच शकणार नाही. संसदीय लोकशाहीत स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही अखंड आणि अभंग अशी तत्त्वप्रणाली आहे. समाजात समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मुठभर लोकांचे जनतेचे राज्य असणे असा होईल. जर समता ही स्वातंत्र्यशून्य असेल तर ती व्यक्तिच्या जीवनातील स्वयंप्रेरणा नष्ट करील. म्हणून भारतीय समाजात सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय देशाची राजकीय लोकशाही परिपक्व होणार नाही. तसेच राज्यकर्त्याने संविधानिक नैतिकतेचे पालन करणार नाही तोपर्यंत हा शासन प्रकार यशस्वी होणार नाही. वरील धोक्याची जाणीव ठेवून राज्यकर्त्यांनी राज्यकारभार केला तर संसदीय लोकशाही यशस्वी होईल.

**संदर्भग्रंथ :**

१. कीर धनंजय; डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९२.
२. भोसले शिवाजीराव; दीपस्तंभ, अक्षरब्रम्ह प्रकाशन, पुणे.
३. डोळे ना.य.; भारतीय राजकीय विचारवंत, विद्या पब्लिकेशन, नागपूर.
४. वराडकर रा.घ.; भारतीय राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर.
५. संत ज.गो.; असा मी जगलो, सुगावा प्रकाशन, पुणे.
६. मेश्राम वामन; द्विदलीय संसदीय जनतंत्र, मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, दिल्ली.